संक्षिप्त

शामराव शिंदे सन्मान सोहळा

नाशिक : जिल्ह्यातील भगूरचे आणि मुंबई येथील गुन्हे शाखेतील सहायक आयुक्त शामराव शिंदे यांना 'राष्ट्रपती पुरस्कार' मिळाल्याबद्दल सजग नागरिक संघ आणि साहित्यिक मित्र परिवाराच्या वतीने २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता येथील सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या हस्ते आणि माजी खासदार हेमंत गोडसे यांच्या अध्यक्षतेखाली सोहळा होणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन सार्वजनिक वाचनालयाचे कार्याध्यक्ष संजय करंजकर, सहायक सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, नाट्यगृह सचिव गणेश बर्वे, परिवहन अधिकारी उत्तमराव जाधव आणि सर्व क्षेत्रांतील साहित्यिक मित्रपरिवाराने केले आहे.

तन्वी पाळदे हिचा सन्मान

नाशिक : गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एस.एम.आर.के. बी.के.ए.के. महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनी तन्वी पाळदे हिने एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या गृहविज्ञान शाखेतून 'मानव विकास' विषयात विशेष प्रावीण्य मिळवत पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकाविल्याने तिला 'श्रीमती लीलावती एम.' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तन्वीने मिळवलेल्या या यशाबद्दल प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर, उपप्राचार्य प्रा. डॉ. नितीन सोंगिरकर, कला विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. सुरेश कानडे, गृहविज्ञान विभागाचे समन्वयक संजय पबारी आणि मानव विकास विभागाच्या विभागप्रमुख प्रा. संगीता कांबळे आदींनी अभिनंदन केले आहे.

मराठमोळ्या गाण्यांची लोकधारा

नाशिक : येथील एसडी कराओके सिंगिंग सेंटरतर्फे रविवारी मराठमोळ्या मातीतल्या गाण्यांची सुरेल मैफल रंगणार आहे. शैला आणि दत्ता नेरकर यांनी आयोजित केलेली 'महाराष्ट्राची कराओके लोकधारा' ही मैफल सायंकाळी ५.३० वाजता होईल. परशुराम सायखेडकर नाट्यगृहात विनामूल्य होणाऱ्या या मैफलीत किरण शिरसाट, प्रेम सांगळे, गणेश जाधव, राजेंद्र शेजवळ, दीपक चौधरी, मनोज शिवदे, अनिल जगताप, हेमंत पगारे, नीलकुमार शर्मा हे गायक आणि शैला नेरकर, अर्चना पाटील, अनिता खैरनार, नूतन बिरार, सुलभा देखणे, स्मिता पवार, रेश्मा वाघमारे, अर्चना चांदसरे या गायिका मराठमोळी गाणी सादर करणार आहेत. दत्ता नेरकर सूत्रसंचालन तर पवन वंजारी ध्वनी संयोजन करतील. यावेळी पाच भाग्यवान श्रोत्यांना भेटवस्तू देण्यात येतील. नाशिककर रसिकांनी उपस्थित राहून गाण्यांचा आनंद घ्यावा व कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

महापालिकेचा ढिसाळ कारभार

अनिश्चित पाणीपुरवठ्याचा मालेगावकरांना फटका

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी फुटल्याने विस्कळित झालेला पाणीपुरवठा २४ तास उलटल्यावरही सुरू होऊ शकला नाही. जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू असल्याने बंद पडलेला पाणीपुरवठा नेमका कधी सुरू होईल, याबद्दलची अनिश्चितता कायम आहे. यामुळे शहरवासीयांना टंचाईचा फटका सहन करावा लागत असून महापालिकेचा ढिसाळ कारभार यानिमित्ताने पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

जलवाहिनी फुटल्याने पाणीपुरवठा बंद पडल्यासंदर्भात लोकांना तात्काळ याबाबत माहिती देणे आवश्यक असताना तब्बल १६ तास उलटल्यावर महापालिका प्रशासनाकडून पाणीपुरवठा बंद झाल्याबद्दल अधिकृतपणे कळविले गेले. यामुळे पाण्याच्या प्रतीक्षेत दिवसभर ताटकळत बसावे लागल्याने शहरवासीयांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

सायने जलशुध्दिकरण केंद्रापासून शहरातील विविध जलकुंभांपर्यंत पाणीपुरवठा करणारी एक मीटर व्यासाची जलवाहिनी मंगळवारी रात्री नव्या बस स्थानक परिसरात अचानक फुटली. त्यामुळे उड्डाणपुलाजवळील रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून गेले. काही जागरूक नागरिकांनी महापालिका अधिकाऱ्यांना ही माहिती दिल्यावर जलवाहिनीद्वारे होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला. तरी जलवाहिनीतील पाणी बराच वेळ वाहत राहिल्यामुळे तेथील रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते. लाखो लिटर पाण्याची नासाडी झाली. तसेच संबंधित जलकुंभ भरणे शक्य न झाल्याने बुधवारी निर्धारित असलेल्या भागांमधील पाणीपुरवठा बंद ठेवावा लागला. जलवाहिनी दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले. परंतु, गुरुवारी दुपारपर्यंत ते पूर्ण होऊ शकले नाही. हे काम पूर्णत्वास येण्यासाठी अजून काही तासांचा अवधी लागण्याची शक्यता आहे. मंगळवारी रात्री ही जलवाहिनी फुटली. त्यामुळे बुधवारचा पाणीपुरवठा विस्कळित वा बंद होणे, हे स्वाभाविक होते. मात्र महापालिकेकडून त्या संदर्भातील प्रसिद्धीपत्रक चक्क बुधवारी सायंकाळी प्रसारित केले गेले. त्यामुळे सकाळपासून पाणीपुरवठा होणाऱ्या भागातील अनभिज्ञ राहिलेले रहिवासी पाण्यासाठी दिवसभर ताटकळत राहिले. जलवाहिनी फुटल्याने पाणीपुरवठा बंद झाला असून दुरुस्तीचे काम झाल्यावर पाणीपुरवठा पूर्ववत होईल, असे १६ तास उलटल्यावर महापालिकेतर्फे दिल्या गेलेल्या प्पत्रकात नमूद केले गेले.

महापालिका प्रशासन स्तरावर अशी स्थिती असताना काही राजकीय व्यक्ती आणि महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांकडून मात्र विस्कळित झालेला पाणीपुरवठा एक दिवस विलंबाने सुरू केला जाईल, अशी माहिती सायंकाळी उशिरा समाज माध्यमांद्वारे प्रसारित केली गेली. त्यामुळे पाणीपुरवठा नेमका केव्हा सुरू होईल, यासंदर्भातील संभ्रम आणखी वाढला. शहराला आधीच दोन दिवसआड पाणीपुरवठा केला जात आहे.

मुख्य जलवाहिनी दुरुस्ती आणि पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. लोखंडी जलवाहिनीतील संपूर्ण पाणी निघाल्याशिवाय वेल्डिंगचे काम करणे शक्य झाले नाही. शिवाय पावसाचादेखील व्यत्यय येत आहे. सायंकाळपर्यंत हे काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.
- सचिन माळवाळ, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महापालिका

जलवाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे पाणी पुरवठा बंद झाल्याची समस्या उद्भवली की काय, असा संशय येतो. पाणी पुरवठा विस्कळीत होणे, ही बाब शहरवासीयांसाठी नवीन नाही. परंतु पालिका प्रशासनाकडून त्यासंदर्भात शहरवासीयांना किमानपक्षी जी पूर्वकल्पना देणे, आवश्यक असते. तशी तसदी का घेतली जात नाही, हाही मुख्य प्रश्न आहे. **- ॲड शिशिर हिरे** (विशेष सरकारी वकील)

कालिका देवी मंदिरातील तयारी... नवरात्रोत्सवापासून नाशिकचे ग्रामदैवत कालिका देवीचा यात्रोत्सव प्रारंभ होत आहे. यानिमित्त मंदिरात मूर्तींच्या सुशोभीकरणाची सुरू असलेली तयारी (छायाचित्र : यतीश भानू)

लाभार्थी मानधनापासून वंचित

काँग्रेस सेवादलाची तक्रार

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : संजय गांधी निराधार, श्रावण बाळ आणि दिव्यांग योजनेतील लाभार्थ्यांना सात महिन्याचे मानधन त्वरित मिळावे, अशी मागणी नाशिक शहर काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर यांनी केली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

राज्य शासनाच्या माध्यमातून राज्यभरात दिले जाणारे संजय गांधी निराधार, श्रावण बाळ आणि दिव्यांगांसाठी असलेल्या योजनेतंर्गत मानधन दिले जाते. परंतु, जानेवारीपासून मासिक मानधन लाभार्थींच्या खात्यावर जमा झालेले नाही. संबंधित विभागाशी सातत्याने संपर्क करूनही उपयोग झालेला नाही.

ही समस्या अनेक जिल्ह्यांमध्ये असून या लाभार्थ्यांना जानेवारीपासूनचे मानधन त्वरित मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना शहर काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष डॉ वसंत ठाकूर, माजी नगरसेवक लक्ष्मण धोत्रे, धोंडीराम बोडके, मध्य नाशिक ब्लॉक काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष संतोष हिवाळे आदी उपस्थित होते.

'एआय आणि जिनोमिक्स' यावर उद्या व्याख्यान

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : प्रगतीशील विचारांना चालना देणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकर विवेक व्याख्यानमालेत मराठी विज्ञान परिषद नाशिक विभागाच्यावतीने 'जनुकशास्त्र सद्यस्थिती : वास्तव आणि आभास' या विषयावर १४१ वे व्याख्यान शनिवारी सायंकाळी सहा वाजता होणार आहे.

शरणपूर रस्त्यावरील आर्किटेक्ट-इंजिनियर्स असोसिएशनच्या वैराज कलादालन सभागृहात हे व्याख्यान होईल. यावेळी मुंबई येथील वरिष्ठ जेनेटिसिस्ट डॉ. स्नेहल महाजन-मल्लकमिर मार्गदर्शन करतील. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जिनोमिक्स या वेगाने विकसित होणाऱ्या शास्त्रांबाबत त्यांचे फायदे, जोखीम आणि नैतिक पैलू यावर सविस्तर चर्चा होईल. व्यक्तिनिष्ठ औषधोपचार, रोग निदानातील प्रगती, गोपनीयतेचे प्रश्न तसेच तंत्रज्ञानाच्या गैरवापराची शक्यता यांसारखे महत्त्वाचे मुद्दे उलगडले जातील. या व्याख्यानामुळे विज्ञानप्रेमी, विद्यार्थी, शिक्षक आणि वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिकांना या अत्याधुनिक विषयांची समज वाढवण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रम विनाशुल्क असून नाशिककरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, नाशिक विभागाचे अध्यक्ष डॉ धनंजय अहिरे यांनी केले आहे.

दलालांना चाप लावण्यासाठी सीएससी केंद्राशी करार

अण्णासाहेब पाटील महामंडळाची सावधगिरी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थींची राज्यात दलालांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक होत असल्याची बाब महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी पत्रकार परिषदेत उघड केली होती. असे प्रकार रोखण्यासाठी महामंडळाने आता सीएससी (कॉमन सर्व्हिसेस सेंटर) केंद्राशी करार केला आहे.

महामंडळाच्या नावाने संशयितांनी व्हॉट्सॲप गटावर बनावट जाहिरात टाकून मराठा प्रवर्गात नसलेल्या उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम उकळली. बनावट कागदपत्र सादर करून कर्ज प्रकरण मंजूर करीत लाखोंचे अनुदान लाटल्याचे गेल्या महिन्यात उघड झाले होते. या प्रकरणी गौरव मंचरे (राहता, अहिल्यानगर), राहुल चोळके (अहिल्यानगर), विश्वजित गांगुर्डे, मनोज जगताप आणि विश्वास जगताप यांच्याविरोधात सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राज्यात दलालांच्या माध्यमातून लाभार्थ्यांची फसवणूक होत असल्याचे पत्रकार परिषदेत महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले होते.

असे प्रकार राज्यात कुठेही घडू नयेत म्हणून महामंडळाने सीएससी केंद्राशी करार केला आहे. महामंडळाच्या राज्यातील सर्व लाभार्थींना सीएससी केंद्राच्या माध्यमातून सेवा मिळणार आहे. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख, सीएससी केंद्राचे प्रमुख वैभव देशपांडे यांच्या उपस्थितीत या करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सीएससी योजनेंतर्गत राज्यात ७२ हजारांपेक्षा अधिक केंद्रे कार्यरत आहेत. लाभार्थी जवळील केंद्रावर जाऊन महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतील. यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी अर्ज भरणे, कागदपत्र अपलोड करणे, योजनेची सद्यस्थिती तपासणे व अत्यावश्यक मार्गदर्शन मिळवणे यासारख्या सुविधांचा समावेश आहे.

सीएससी केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध सरकारी व खासगी सेवा पुरवण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. महामंडळाच्या करारामुळे लाभार्थींना लाभार्थींना गावातूनच पात्रता प्रमाणपत्र (एलओआय) कागदपत्र, बँकेचे कर्ज मंजुरी, बँक हप्त्याच्या नोंदी अपलोड करण्यासाठी प्रत्येकी ७० रुपये शुल्क आकारण्यात येणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक देशमुख यांनी दिली.

'सीएससी'बरोबरच्या करारामुळे आमची उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे पूर्ण होतील. राज्याच्या कानाकोपऱ्यांत असलेल्या गरजू आणि पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना पोहोचणार आहेत. कमी खर्चात, त्यांच्या घराजवळ आवश्यक सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करून मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचा महामंडळाचा उद्देश पूर्ण होईल.
- नरेंद्र पाटील, अध्यक्ष, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

विज्ञान नाट्य महोत्सवात विरगावचे विद्यालय प्रथम

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : बागलाण पंचायत समितीचा शिक्षण विभाग आणि बागलाण तालुका विज्ञान अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सटाणा येथे आयोजित तालुकास्तरीय विज्ञान नाट्य महोत्सवात विरगाव येथील के.बी.एच. विद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. या विद्यालयाची जिल्हास्तरासाठी निवड झाली आहे.

सटाणा येथील लोकनेते पंडितराव धर्माजी पाटील मराठा इंग्लिश स्कूलच्या देवमामलेदार सभागृहात हा विज्ञान नाट्य महोत्सव झाला. महोत्सवाचे उदघाटन मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे चिटणीस दिलीप दळवी यांच्या हस्ते झाले. यावेळी दळवी यांनी रंगमंचावरील विविध नाट्यप्रयोगातून विद्यार्थ्यांमध्ये कलागुणांची जोपासना होण्यासह आत्मविश्वास निर्माण होत असल्याचे सांगितले. मोबाईल, इंटरनेटसारख्या माध्यमातून माहितीचा व्यापक स्रोत उपलब्ध होत असला तरी, स्वतःची विचारशक्ती घडविण्यासाठी कलात्मक उपक्रमांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास मविप्र संस्थेच्या संचालिका शालनताई सोनवणे, गटशिक्षणाधिकारी चित्रा देवरे, विस्ताराधिकारी तुषार महाले, मुख्याध्यापक विनायक बच्छाव, विज्ञान अध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष दत्तराज ह्याळीज, विकास सोनवणे, काकाजी भामरे, अरुण गरुड, परीक्षक शशिकांत कापडणीस, शितल बच्छाव, दीपक जाधव आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

नाट्य महोत्सवात तालुक्यातील १२ संघांनी सहभाग घेतला. महोत्सवात द्वितीय क्रमांक तळवाडेदिगर माध्यमिक विद्यालय, तृतीय - जिजामाता गर्ल्स हायस्कूल सटाणा, उत्तेजनार्थ - मराठा इंग्लिश स्कूल सटाणा आणि लखमापूर येथील पं.ध.पा. विद्यालय आदींनी यश मिळविले. प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी चित्रा देवरे यांनी केले. पारितोषिक वितरण समारंभात विस्तार अधिकारी तुषार महाले, परीक्षक शशिकांत कापडणीस आदींनी मनोगत व्यक्त केले.

सटाणा येथे आयोजित तालुकास्तरीय विज्ञान नाट्य महोत्सवातील विजेत्यांना सन्मानित करताना मान्यवर (छायाचित्र : शशिकांत कापडणीस)

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे उद्घाटन

नाशिक : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या उपक्रमाचा जिल्ह्यातील उद्घाटनाचा कार्यक्रम पिंप्री सय्यद येथे मंत्री गिरीश महाजन, आ. सरोज अहिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

ग्रामपंचायतींना शाश्वत विकासासाठी सक्षम करणे, नागरिकांच्या सहभागातून पारदर्शक अंमलबजावणी साध्य करणे आणि ग्रामपंचायतींचे प्रशासन अधिक कार्यक्षम बनविणे हे प्रमुख उद्दिष्ट या अभियानाचे आहे. अभियानात गाव विकास आराखड्याची निर्मिती, निधीचा परिणामकारक वापर, गाव स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, महिला सक्षमीकरण, शैक्षणिक उन्नती व डिजिटल पंचायत या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व सरपंच, ग्रामस्थ यांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन महाजन यांनी केले. आमदार अहिरे यांनी गाव विकास करतांना पर्यावरणपूरक बाबींचा विचार करावा, नैसर्गिक साधनसंपत्तीची वाढ कशा प्रकारे करता येईल, याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन केले. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी या अभियानात प्रत्येक ग्रामपंचायतींनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामस्थांसाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. लाभार्थ्यांना आयुष्यमान गोल्डन कार्ड वाटप करण्यात आले. पोषण आहार सप्ताह राबवून महिला आणि बालकांच्या पोषणाविषयी जनजागृती करण्यात आली. स्वस्थ-नारी सशक्त परिवार या कार्यक्रमाद्वारे महिला सक्षमीकरणाला चालना देण्यात आली. ग्रामपंचायतीच्या संकेतस्थळाचे अनावरण करून डिजिटल पंचायत संकल्पनेची सुरुवात झाली. 'स्वच्छता ही सेवा' या विशेष उपक्रमाचा शुभारंभ करून ग्रामस्वच्छतेचा संकल्प करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या सहभागाचे आवाहन

मालेगाव तालुक्यातील ग्रामपंचायत दाभाडी येथे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ केला, लोकसहभागातून अभियान यशस्वी करत प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या गावात नावीन्यपूर्ण संकल्पना राबवाव्यात, विद्यार्थ्यांनादेखील या अभियानात सहभागी करून जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले, यावेळी स्वच्छता ही सेवा याबाबत शपथ घेण्यात आली.

'आई हे एकच नाते चिरंतन'

नाशिक : प्रत्येक आईचा मुलगा कवी नसतो, पण प्रत्येक मुलासाठी त्याची आई एक सुंदर कविता असते. आणि ती कविता तो मुलगा आयुष्यभर काळजात जपत असतो. सर्व नाती नश्वर असतीलही पण आई हे एकच नाते चिरंतन आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कवी कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले.

येथील सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात कवी राजेंद्र उगले यांच्या 'आई कधीच नसते मरत..!' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. अनेक कवींनी आजवर या विषयावर कविता लिहिल्या. परंतु, आईच्या एकत्रित आणि एकाच कवीने लिहिलेल्या कवितांचा हा संग्रह विरळा असल्याचे डॉ. धोंडगे यांनी सांगितले. प्राचार्य लक्ष्मण महाडिक यांनी कवितांचे संदर्भ आणि शब्दकळा उलगडून दाखवताना यातील काही ओळी या भविष्यात सुभाषिते म्हणून वापरली जातील असे मत व्यक्त केले. गीतकार प्रकाश होळकर यांनी प्रत्येकाला आपली आई आठवत राहील, असा हा काव्यसंग्रह असल्याचे सांगितले. कवी विवेक उगलमुगले, ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक विजयकुमार मिठे यांनीही मनोगत व्यक्त केले.

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पुनावाला हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ज्ञात असलेली)
नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, "बी" बिल्डिंग, गंगा ट्रॅझो, लोहेगाव, पुणे-४११०१४, महाराष्ट्र.
शाखा कार्यालय युनिट: ऑफिस नं.४०४ व ४०५, चौथा मजला, "ए" विंग, एबीएच कॅपिट फेज-१, रामायण बंगलोसमोर, टिळकवाडी, नाशिक-४२२००१.

ई-लिलाव - विक्रि सूचना (सरफेसी ॲक्ट अंतर्गत सुरक्षित स्थावर मत्तेची विक्रि)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल्स ८ व ९ यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट ("ॲक्ट") अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्रि सूचना. आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको / सह-ऋणको / गहाणकार / हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, "गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"कडे, पूर्वीची पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली, १७ नोव्हें. २०२३ च्या प्रभावापासून पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे नाव "गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" असे बदलले असल्याने (पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली आणि मूळ जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक अनलिमिटेड कंपनी या नावाने विधि संस्थापित) (यापुढे ॲक्टनुसार "सुरक्षित धनको" म्हणून संदर्भित) गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेच्या अनुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल्स ८ व ९ यासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे. सुरक्षित मत्तेची विक्रि ई-लिलावाद्वारा "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर **०७/१०/२०२५ रोजी** करण्यात येणार आहे. आम जनतेस याद्वारा कळविण्यात येते की, आम्ही https://www.bankeauctions.com या वेबसाइटवर तरतूद केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत जाहीर लिलावाचे आयोजन करीत आहोत. विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता **www.grihumhousing.com** या "जीएचएफएल"च्या / म्हणजेच सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

अनु. क्र.	प्रस्ताव क्र. / ग्राहकाचे नाव (ए)	मागणी सूचना तारीख व थकित रक्कम (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (ई)	इरठे (राखीव किमतीच्या १०%) (एफ)	इरठे सादरीकरणाची तारीख (जी)	बोली वृद्धी (एच)	मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयिन प्रकरणे, जर असल्यास (के)
१	लोन नं. : HL0062710000 0005032259 सुखीलाल नंदलाल वर्मा (ऋणको) / अनिता सुखीलाल वर्मा	सूचना तारीख : ०७/०१/२०२५ एकूण देणी : रु. १७३१३७४/- (रुपये सतरा लाख एकतीस हजार तिनशे चौऱ्याहत्तर फक्त) वसूलीपर्यंत १२.५% प्र. व. दराने पुढील व्याजासह ०७/०१/२०२५ रोजी प्रमाणे देय	प्रत्यक्ष	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - धारण केलेला रो हाऊस नं. ०१ असलेला प्लॉटेड एरिआ मोजमापाचा ३७.१३ चौ.मी. व बिल्ट-अप एरिआ मोजमापाचा ७२७.०० चौ.फू. म्हणजेच ६७.५५ चौ.मी., "एकदंत पार्क" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील, प्लॉट नं १ यावर बांधकाम केलेला असलेला एकूण एरिआ मोजमापाचा ५४८.०० चौ.मी., गॅट नं. १६४/१६५/सी/बी यापैकी व येथे स्थित - मौजे मालेगाव, ता. सिन्नर व जि. नाशिक, सिन्नर म्युनिसिपल काउंसिल, सिन्नरच्या मर्यादेत. पुढीलप्रमाणे सिमित : प्लॉट नं. ०१ - पूर्व : १८ मी. कॉलनी रोड, पश्चिम : प्लॉट नं. १०, १२, दक्षिण : लगतचा गॅट नं. १६४+१६५ पोट हिस्सा, उत्तर : प्लॉट नं. २. रो हाऊस नं. ०१ - पूर्व : उक्त प्लॉटचा शॉप, पश्चिम : रो हाऊस नं. २, दक्षिण : लगतचा गॅट नं. १६४+१६५ पोट हिस्सा, उत्तर : ३.०५ मी. रोड.	रु. ११,५०,०००/- (रुपये अकरा लाख पन्नास हजार फक्त)	रु. १,१५,०००/- (रुपये एक लाख पंधरा हजार फक्त)	२९/०९/२०२५ रोजी सायं ०५.०० वा. पूर्वी	१०,०००/-	२६/०९/२०२५ (स.११.०० - दु. ०४.००)	०७/१०/२०२५ (स.११.०० - दु. ०२.००)	काही नाही

स्वारस्य असलेले बोलीदार / खरीददारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी लिलावात ठेवलेली मालमत्ता व सुरक्षित धनकोच्या शाखेला भेट द्यावी, आणि बोली सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत त्याने / तिने / त्यांनी स्वतः अतिरिक्त आकार आणि भार तसेच त्रयस्थ पक्षकाराचे हित याबाबत चौकशी करावी आणि स्वतःचे समाधान करून घ्यावे. निश्चित करावयाच्या मालमत्तेशी सलग्न मालमत्ता कर, विद्युत / पाणी देणी व अन्य कोणतीही देणी, जर असल्यास, यासारखी सर्व सांविधिक देणी यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदान करावयाची आहेत.
स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे आणि लिलाव सेवा-पुरवठाकार सी१ इंडिया प्रा. लि., पत्ता : प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, गुरगाव, हरयाणा-१२२००३, हेल्पलाईन नं. ७२९१९८११२४, २५, २६ सपोर्ट ईमेल आयडी - Support@bankeauctions.com संपर्क व्यक्ती - धरणी पी, ईमेल आयडी - dharani.p@c1india.com संपर्क क्र. ९९४८१८२२२२ यांच्याकडून आधीच लॉग-इन आयडी व पासवर्ड प्राप्त करावा, जो ई-बोली प्रक्रियेकरिता अनिवार्य आहे. भावी बोलीदारांनी कृपया नोंद घ्यावी की, ते त्यांच्याकडून ई-लिलाव प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतील. स्वारस्य असलेले खरीददार / बोलीदारांनी २९/०९/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी कोणत्याही नॅशनलाइज्ड व शेड्यूल्ड बँकेवर काढलेली **खात्याचे नाव - "गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड", ऑक्शन प्रोसिड्स अका., खाते क्र. ०९१५५१०००२८ व आयएफएससी कोड - आयसीआयसी०००९१५, आयसीआयसीआय बँक लि., पंचशील टेक पार्क, गणपथी चौकाजवळ, ४३/४४, विमान नगर - ४११०१४ यांच्या खात्यात एनईएफटी / आरटीजीएस / डीडी द्वारा इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करणे आवश्यक आहे आणि** https://www.bankeauctions.com यावर त्यांच्या नावांची नोंदणी करावी आणि सेवा-पुरवठाकाराकडून ई-लिलावावरील प्रशिक्षण घ्यावे व विनामूल्य युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावा. वेबसाइटवर त्यांची नोंदणी झाल्यानंतर, स्वारस्य असलेले खरीददार / बोलीदारांनी खालील अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करणे आवश्यक आहे आणि पत्ता : **ऑफिस नं. ४०४ व ४०५, चौथा मजला, "ए" विंग, एबीएच कॅपिट फेज-१, रामायण बंगलोसमोर, टिळकवाडी, नाशिक-४२२००१ मोबा नं. +९१ ९५६७६२६०५० ईमेल आयडी :** rahul.r1@grihumhousing.com यावर स्वयं-साक्षांकित सत्य पत्र ईमेल करावी व पाठवावी. शर्ती व अटींवरील अधिक तपशीलाकरिता, कृपया https://www.bankeauctions.com या वेबसाइटला आणि ई-लिलावात सहभागी होण्याकरिता **www.grihumhousing.com** या वेबसाइटला भेट द्यावी.
ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल २००२च्या रुल ८(६) अंतर्गत ऋणको / सह-ऋणको / गहाणकार / हमीदारांना १५ दिवसीय सूचना म्हणून सुद्धा समजण्यात यावी.
कोणत्याही प्रकरणात जर तेथे स्थानिक भाषेतील प्रसिद्धी आणि इंग्रजी वृत्तपत्रातील प्रसिद्धीच्या मजकूरात कोणताही फरक आढळून आल्यास, दि इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेला मजकूर ग्राह्य धरला जाईल.

दिनांक : १९-०९-२०२५ स्थळ : नाशिक
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पुनावाला हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ज्ञात असलेली)